# विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय

## बचतधाम विश्रामगृह समिती
## अल्प मुदतीची जाहीर सूचना

या कार्यालयाच्या अधिनस्त असणाऱ्या सेक्टर १०, सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहातील उपाहारगृह भाडेतत्वावर चालविण्यास देणे प्रस्तावित आहे.

सदरहू उपाहारगृह भाडेतत्वावर चालविण्यास इच्छुक व्यक्तींकडून दि.१४.०३.२०२२ पर्यंत दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची अधिक माहिती, अर्जाचा नमुना, इत्यादी (www.http://divcomkonkan.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-XXX

**साशा/इमारत/कक्ष-१/बचतधाम-उपाहारगृह/२०२२**
**दिनांक : ०३.०३.२०२२**
**(संपर्क क्र.०२२-२७५७१५०१)**

**सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती**
**तथा उप आयुक्त(सामान्य प्रशासन)**
**कोकण विभाग**

Scanned with CamScanner

## बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृह भाडेतत्वावर चालविणेबाबत.

❖ **बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृहाचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे-:**

| अ.क्र. | सेवा | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | उपाहारगृह | १३१.२९ चौ. मी. |
| २ | स्वयंपाकगृह | २५.६० चौ. मी. |
| ३ | भांडारगृह | १०.८५ चौ. मी |

## दरपत्रक संदर्भात नियम व अटी

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १ | मोहोरबंद पाकीटात दरपत्रक समक्ष दिनांक ०४.०३.२०२२ ते दिनांक १४.०३.२०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी या कार्यालयातील इमारत कक्ष, पहिला मजला, कोंकण भवन येथे जमा करावीत. त्यावर ***बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृह चालविणेबाबत दरपत्रक*** असा स्पष्ट उल्लेख असावा. सदरहू दरपत्रक अर्जासोबत **लिफाफा अ)** मध्ये आवश्यक शासकीय परवाने व कागदपत्रे तसेच वैयक्तिक कागदपत्रे समाविष्ट करुन व **लिफाफा ब)** मध्ये दरपत्रक समाविष्ट करुन दोन **स्वतंत्र** लिफाफे **(लिफाफा अ व ब)** या कार्यालयास सादर करावेत. दरपत्रक दिनांक १५.०३.२०२२ रोजी दुपारी ०३.१५ वाजता उघडण्यात येईल. दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रकधारक यांना हजर राहता येईल. |
| २ | दरपत्रकधारक यांनी इसाऱ्याची रक्कम रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) या कार्यालयातील इमारत कक्ष, पहिला मजला, कोंकण भवन येथे जमा करावी. इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर इमारत कक्षाकडून प्राप्त झालेली पावती दरपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही. सदरची इसारा रक्कम ना-परतावा असेल. |
| ३ | सदरहू बचतधाम विश्रामगृहातील उपाहारगृह चालविण्याचा कालावधी दिनांक ०१.०४.२०२२ ते दिनांक ३१.०३.२०२३ असा असेल. |
| ४ | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी दरपत्रकधारकास आवश्यक तो वस्तू व सेवा कर (GST) भरावा लागेल, तसेच वस्तू व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा या कार्यालयास सादर करावा लागेल. |
| ५ | दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार बचतधाम विश्रामगृह समितीने राखून ठेवले आहेत. |
| ६ | यशस्वी दरपत्रक धारकास दरपत्रक स्विकृत झाल्याचे कळल्यापासून सुरक्षा अनामत ठेव रक्कम रुपये ५०,०००/- या कार्यालयाकडे राष्ट्रीयकृत बँकेचे डी. डी. व्दारे भरणा करावी. डी. डी. *बचतधाम समिती कोकण भवन* या नावाने काढावा. |
| ७ | कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार बचतधाम विश्रामगृह समितीस राहतील. |
| ८ | उपाहारगृहातील खाद्य पदार्थांचा दर्जा व सेवा चांगल्या दर्जाची असावी. |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| ९ | उपाहारगृहाची जागा व परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी यशस्वी दरपत्रकधारकाची राहील. |
| १० | बचतधाम विश्रामगृहाकरीता येणाऱ्या एकूण वीज व पाणी देयकाच्या रक्कमेतील ५% वीजेच्या व पाण्याच्या देयकाचा भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी दरपत्रकधारकाची असेल. |
| ११ | बचतधाम विश्रामगृहातील उपाहारगृह चालविण्याकरीता नोंदणीकृत महिला बचतगटास प्राधान्य देणेत येईल. |
| १२ | बचतधाम विश्रामगृहाच्या मालमत्तेचे कोणत्याही स्वरुपाचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील व अशी नुकसान भरपाई एक महिन्याच्या आत करुन देणे बंधनकारक राहील. |
| १३ | बचतधाम विश्रामगृहाच्या उपाहारगृह चालविणेकरीता आवश्यक असणारे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले परवाने असणे बंधनकारक आहे. |
| १४ | बचतधाम विश्रामगृहाच्या उपाहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचे दर हे वाजवी असणे आवश्यक आहे. सदर दरांबाबतचा फलक उपाहारगृहाच्या दर्शनी भागात लावणे दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील. |
| १५ | बचतधाम विश्रामगृहात येणाऱ्या शासकीय, निमशासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेकरीता तसेच बाहेरील खाजगी व्यक्तींकरीता जेवण, चहापानाची व्यवस्था सकाळी ०७.०० ते रात्री १०.०० पर्यंत करणे बंधनकारक राहील. तसेच आवश्यक असल्यास ग्राहकांना त्यांचे आरक्षित कक्षामध्ये सेवा देणे आवश्यक राहील. |
| १६ | बचतधाम विश्रामगृहाच्या उपाहारगृहात कोणत्याही प्रकारचे मादक पदार्थ ठेवण्यास परवानगी नाही. तसे आढळून आल्यास आपला करार संपुष्टात येईल. |
| १७ | बचतधाम विश्रामगृहाच्या उपाहारगृहाकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा भरणा ***बचतधाम समिती कोकण भवन*** या नावाने करण्यात यावा. |
| १८ | उक्त सेवांबाबत दरपत्रकधारकाने उपाहारगृहात नेमलेल्या व्यक्तींबाबत भविष्यात काही अपघात, जिवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. तसेच त्याबाबत दरपत्रकधारक व संबंधित व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. |
| १९ | दरपत्रकधारकास वरील सर्व नियम व अटी मान्य असल्यास त्यांनी याबाबत रुपये १००/- च्या बॉन्ड पेपरवर लेखी करारनामा करुन या कार्यालयास सादर करावा. |

**सही/-xxx**
**(मनोज रानडे)**
**सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती तथा**
**उप आयुक्त(सामान्य प्रशासन)**
**कोकण विभाग**

Scanned with CamScanner

# नमुना अर्ज

दिनांक :-

प्रति,
मा.अध्यक्ष,
बचतधाम समिती तथा
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

विषय :- **बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृह भाडेतत्वावर चालविणेबाबत.**

महोदय,

आपले कार्यालयाकडील जाहीर सूचना क्रमांक साशा/कक्ष-१/इमारत/बचतधाम-उपाहारगृह/२०२२ दिनांक ०३.०३.२०२२ अन्वये उप आयुक्त(सामान्य प्रशासन), कोकण विभाग तथा सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती यांनी आपले कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या माहिती, नियम व अटीनुसार मी उपाहारगृह चालविण्याच्या जागेचे भाडेबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

मी दरपत्रकाबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

| अ.क्र. | आवश्यक माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव | |
| २ | मोबाईल क्रमांक | |
| ३ | ई-मेल आयडी | |
| ४ | दरपत्रकधारक एजन्सीचा संपूर्ण पोष्टाचा पत्ता | |
| | **लिफाफा-अ मध्ये समाविष्ट करावयाची कागदपत्रे** | सोबत जोडले आहे अगर कसे? (होय / नाही) |
| १ | महानगरपालिका गुमास्ता परवाना | |
| २ | अन्न व औषध प्रशासन विभागाकडील परवाना | |
| ३ | अग्निसुरक्षा प्रमाणपत्र | |
| ४ | उदयोग आधार | |
| ५ | आयटी रिटर्न (मागील सलग २ वर्षाचे) | |
| ६ | अनुभवाबाबतचे प्रमाणपत्र | |
| ७ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| ८ | आधारकार्ड प्रमाणपत्र | |
| ९ | पॅनकार्ड | |
| १० | इसान्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |

आपला विश्वासू,

(दरपत्रकधारकाचे नाव व स्वाक्षरी)

Scanned with CamScanner

लिफाफा ब मध्ये समाविष्ट करावयाचे कागदपत्र

# RATE QUOTATION

As per QUOTATION NOTICE No.GAD/DESK-1/
BUILDING/BACHATDHAM-CANTEEN/2022
Date 03.03.2022 For Bachatdham Rest House-Canteen,
CBD-Belapur, Navi Mumbai

NAME OF THE AGENCY :-

Full Postal Address :-

Mobile No. :-

E-mail Id :-

GST No.

| Sr. No. | Quoted Rate for Canteen Per Month (In Rupees) |
|---|---|
| 1 | |

**Name and Signature of Applicant**

Scanned with CamScanner